# पुणे जिल्हा परिषद, पुणे
# राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग
# जाहिर स्थगिती प्रकटन

**१५ व्या वित्त आयोगांतर्गत नागरी आरोग्यवर्धिनी केंद्राकरीता बीएएमएस वैद्यकिय अधिकारी यांचे थेट मुलाखतीस स्थगिती देणेबाबत.**

दिनांक :- २९/०२/२०२४

राष्ट्रीय आरोग्य अभियान १५ व्या वित्त आयोगांतर्गत नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रांतर्गत नगरपरिषद, पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत बीएएमएस वैद्यकिय अधिकारी यांची रिक्त पदे थेट मुलाखतीद्वारे भरण्याबाबत या कार्यालयाकडुन जाहिर प्रकटन दिनांक ११.०१.२०२४ रोजी जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले होते.

सदर प्रकटनानुसार दिनांक १६.१.२०२४, २३.१.२०२४, ३०.१.२०२४, ६.२.२०२४ व १३.०२.२०२४ रोजी नविन जिल्हा परिषद, जिल्हा परिषद पुणे येथे थेट मुलाखतीकरीता बीएएमएस वैद्यकिय अधिकारी एकुण १२३ उमेदवार उपस्थित होते.

त्यानुसार सदर अर्जांची छाननी करुन उमेदवारांची संवर्गनिहाय गुणवत्तेनुसार पदभरती करण्यात आलेली आहे.

जर भविष्यात सदर अर्जांतुन बीएएमएस वैद्यकिय अधिकारी या पदांची पदभरती पुर्ण न झाल्यास तसेच पदे रिक्त राहिल्यास याबाबत सविस्तर माहिती सदर संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच विशेषतज्ञ व वैद्यकिय अधिकारी एमबीबीएस या पदांच्या थेट मुलाखती सुरु असुन दर मंगळवारी मुलाखती चालु राहतील.

तरी या आदेशान्वये दि.११/०१/२०२४ रोजी प्रसिध्द झालेले बीएएमएस वैद्यकिय अधिकारी या पदाच्या थेट मुलाखतीचे जाहिर प्रकटन सद्यस्थितीत स्थगित करण्यात येत आहे तरी बीएएमएस वैद्यकिय अधिकारी या पदासाठी पुढील आदेश होई पर्यंत थेट मुलाखतीस येणेचे नाही.

**रमेश चव्हाण (भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, पुणे**